# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०५/०२/२०२५ (बुधवार)दुपार

---

### घरफोडी चा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक
### कळमेश्वर पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक ०४/०२/२०२५ रोजी रात्री ०१:३० वाजेच्या सुमारास यातील फिर्यादी नामे अश्विनी आनंद औरंगाबादकर वय ६० वर्ष रा. अमरावती रोड ,हिंदुस्थान कॉलनी,स्टेट बँक कॉलनी जिल्हा नागपूर यांना त्याच्या मौजा अष्टीकला येथील शेतात काम करणारे बाळकृष्ण सोनटक्के यांनी फोन द्वारे सांगितले की फार्म हाऊस मधील घरातील आलाराम वाजत आहे. त्यामुळे लगेच फिर्यादीने कळमेश्वर पोलीस स्टेशनला सर्व घटनेची माहिती दिली. पोलीसांनी तात्काळ माहीती ची दखल घेत फिर्यादी व त्याचे पती यांच्यासह घटनास्थळावर पोहचले असता तिथे त्यांना घराचे मागच्या बाजूला आवाज आला त्यामुळे त्यांनी मागच्या बाजूला जावुन बघितले असता तिथे तीन ते चार इसम हे घराच्या मागच्या दरवाजा जवळ उभे दिसले ते सर्व दरवाजा तोडत होते. पोलीसांना पाहताच त्यांनी पळ काढला. त्यापैकी एक आरोपी नामे **मोहसीन खान शब्बीर खान वय ३७ वर्ष राहणार गल्ली नंबर ०२ खरबी रोड नागपूर** यास पोलीसांनी शिताफिने पकडले असुन घटनास्थळावरून १. लोखंडी पाईप २. एक लोखंडी सब्बल,३ एक लोखंडी पाईप असे जप्त करण्यात आले आहे.कळमेश्वर पोलसांनी फिर्यादीच्या रिपोर्ट वरून कलम ३३१(४), ३०५(ए), ६२, ३(५)भान्यासं अन्वये गुन्हा नोंदवुन **आरोपीला अटक केली आहे.**

### प्राणांतिक अपघात

**पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत मौजा महादुला शिवार रामटेक तुमसर रोड येथे ०४/०२/२५ चे ०४/०० वा. ते ०४/१५ वा. दरम्यान शुभम रामेश्वर मेश्राम वय २५ वर्ष,रा. टिळक वार्ड पालोरा,ता.मोहाडी,जि.भंडारा इतर ०९ असे मिळुन टाटा कंपनीचे मालवाहु वाहन क्र.एम एच ३६ ऐऐ १३२३ चा चालक आरोपी नामे अभिषेक ईश्वरदास भेलावे वय २४ वर्ष रा.टिळक वार्ड ,पालोरा ता. माहाडी जि.भंडारा यांच्यासह

गाडीचा डाल्यात मागे बसुन रामटेक तुमसर मार्गे गावी येथे जात असताना डुलकी आल्याने गाडी चालकाचे वाहनासवरील नियंत्रणसुटुन गाडीचा अपघात झाला. गाडीमध्ये बसलेल्या इसमांपैकी फिर्यादीचा भाउ **मृतक** मयुर रामेश्वर मेश्राम हा गंभीर जखमी होवुन जगीच मरण पावला व इतर तीन लक्की बागडे,निकेश ठवकर ,वैभव बागडे हे गंभीर जखमी झाले यातील आरोपी चालक याने त्याचा ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन सदर गाडीस मालवाहु वाहतुकीचा परवाना असताना त्यात अवैध्यरीत्या प्रवासी बसवुन वाहतुक केली त्यामुळे मृतकाच्या मरणात व तिन्ही जखमींच्या दुखपतीस कारणीभुत ठरला आहे अशा फिर्यादीचा रीपोर्ट वरून पोलीस स्टेशनला आरोपी **नामे अभिषेक ईश्वरदास भेलावे वय २४ वर्ष रा.टिळक वार्ड ,पालोरा ता. माहाडी जि. भंडारा च्या विरूध्द कलम २८१,१२५(अ),१२५(ब),१०६(१),बी.एन.एस सह. कलम१८४,६६(१),१९२ मो.वा.का गुन्हा नोंद आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**